**दिनांक ०१.०५.२०२६ रोजी मा.ना.श्री. सहकार मंत्री यांना मिशन अहवाल भेट तसेच विदर्भ व मराठवाड्यामध्ये सहकारी दूध उत्पादक संघ वाढविण्यासंदर्भात चर्चा**





दिनांक ०१.०५.२०२६ रोजी अमरावती येथे सहकार विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा





**दिनांक ०४.०५.२०२६ रोजी जिल्हाधिकारी नागपूर व कृषी विभाग, पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यांचे समवेत खरीप आढावा व चारा लागवड संदर्भात बैठक**






**दिनांक ०४.०५.२०२६ रोजी मा. ना.श्री. चंद्रशेखर बावनकुळे साहेब, पालकमंत्री, नागपूर जिल्हा यांचे समवेत नियोजन भवन, नागपूर येथे खरीप हंगाम पुर्व आढावा बैठकीस उपस्थीत**






दिनांक ०५.०५.२०२६ रोजी नाल्याचे बांधावर चारा लागवड तसेच आत्माअंतर्गत शेतक-यांना ड्रायर मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व आत्मा संचालक, अमरावती यांचे समवेत अमरावती येथील दालनात बैठक व चर्चा





**दिनांक ०७.०५.२०२६ रोजी विश्रामगृह, आष्टी येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा**





दि. ०७.०५.२०२६ रोजी साहूर, ता.आष्टी, जि.वर्धा येथे मृतक नंदकिशोर वासुदेव डाहाके शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट





दिनांक ०७.०५.२०२६ रोजी आष्टी तालुक्यातील कुरण लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी





दिनांक ०७.०५.२०२६ रोजी आष्टी तालुक्यातील शेतक-यांचे शेतोपयोगी प्रकल्पास भेट व पाहणी





दिनांक ०८.०५.२०२६ रोजी मौजा कात्री, ता.कळंब, जि.यवतमाळ येथे मृतक दिनेश शालीक भुजाडे यांचे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास





# कात्री येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना भेट



**विदर्भ कल्याण/ कळंब-**

कळंब तालुक्यातील मौजा कात्री येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेत शासनाच्या विविध योजनांचा लाभ तात्काळ मिळवून देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

दिनांक ८ मे २०२६ रोजी मा. ॲड. निलेश हेलोंडे पाटील (अध्यक्ष, राज्यमंत्री दर्जा), कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते कात्री येथील शेतकरी दिनेश शालीक भूजाडे तसेच परसोडी बु. येथील शेतकरी महेश बळवंत ढोले यांच्या कुटुंबांना प्रातिनिधिक स्वरूपात भेट देण्यात आली. या भेटीदरम्यान कुटुंबीयांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळतो आहे की नाही, याची पाहणी करण्यात आली. योजनांपासून वंचित असलेल्या कुटुंबांना तात्काळ लाभ मिळावा यासाठी संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.

यावेळी प्र. तहसीलदार अनंत बकाले, प्र. गटविकास अधिकारी निमेश भोयर, तालुका कृषी अधिकारी सुहास भेंडे, पोलीस उपनिरीक्षक महेंद्र साळवे, सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. सुजाता बन्सोड, महिला व बालविकास अधिकारी रविंद्र गजभिये, बाल विकास प्रकल्प अधिकारी योगीता कुमरे, एपीओ मनरेगा दिनेश वाईकर तसेच विस्तार अधिकारी प्रफुल ठेंगेकर उपस्थित होते. यानंतर तहसील कार्यालय कळंब येथे तालुक्यातील विविध विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना सर्व कल्याणकारी योजनांचा प्राधान्याने लाभ देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, याची दक्षता घेण्यावर भर देण्यात आला.शेतकऱ्यांना शेतीसोबतच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांकडे वळवण्यासाठी विविध विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही सांगण्यात आले. नदी-नाल्यांच्या काठावरील शासकीय व खासगी जमिनीवर चारा पिकांची लागवड करून पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविण्याचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले.

लोकमत

# शेती स्वावलंबन मिशन अध्यक्षांनी जाणल्या शेतकऱ्यांच्या समस्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**कळंब :** महाराष्ट्र राज्य वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी कळंब तालुक्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. कात्री येथील दिनेश शालिक भुजाडे व परसोडी (बु.) येथील महेश बळवंत ढोले या शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. त्यांच्या कुटुंबाच्या भेटीदरम्यान हेलोंडे पाटील यांनी शासनाच्या विविध विभागांकडून मिळणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ त्यांना मिळत आहे की नाही, याची शहानिशा केली. ज्या योजनांपासून ही कुटुंब व तालुक्यातील इतर शेतकरी वंचित आहेत, त्याचा लाभ तत्काळ मिळावा, यासाठी संबंधित विभागांना सूचना दिल्या.

तहसील कार्यालयात तालुक्यातील सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. यामध्ये ॲड. हेलोंडे पाटील यांनी सूचना दिल्या. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्राधान्याने शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना देण्यात यावा. तालुक्यातील कोणताही पात्र शेतकरी लाभापासून



वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. शेतीसोबतच पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन आदी शेतीपूरक व्यवसायातून शेतकऱ्यांना लाभ व्हावा, यासाठी विविध विभागांनी काय कार्यवाही करावी, आदी सूचनांचा यामध्ये समावेश होता. पशुंना मुबलक चारा उपलब्ध व्हावा आणि शेतकरी पूरक व्यवसायाकडे वळावे म्हणून शासकीय व इतर जमिनीवर, नदी-नाल्याच्या काठावरील जमिनीवर चारापिकांची लागवड करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना करण्यात आल्या.

**कळंब तालुक्यातील कात्री व परसोडी येथील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाची घेतली भेट**

या बैठकीला नायब तहसीलदार अनंत बकाले, तालुका कृषी अधिकारी सुहास भेंडे, पोलिस उपनिरीक्षक महेंद्र साळवे, सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. सुजाता बन्सोड, महिला व बालविकास अधिकारी रवींद्र गजभिये, बाल विकास प्रकल्प अधिकारी योगिता कुमरे आदी उपस्थित होते.

दिनांक ०८.०५.२०२६ रोजी मौजा परसोडी बु, ता.कळंब, जि.यवतमाळ येथे मृतक महेश बळवंत ढोले यांचे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास






स्वावलंबन मिशनच्या अध्यक्षांची सूचना, कळंब तालुक्यातील शेतकरी कुटुंबांना भेटी

# पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहू नये!

■ लोकसूत्र प्रतिनिधी

**कळंब** : शेतकऱ्यांसाठी शासन विविध कल्याणकारी योजना राबविते. त्या कल्याणकारी योजनांचा लाभ प्राधान्याने शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास दिला जावा. कोणताही पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी कळंब तालुका प्रशासनाला दिल्या.

राज्याच्या कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा), ॲड. नीलेश हेलोंडे पाटील हे काल ८ मे रोजी कळंब तालुक्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी तालुक्यातील कात्री येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी दिनेश शालिक भुजाडे व परसोडी बु. येथील महेश बळवंत ढोले यांच्या कुटुंबास प्रतिनिधिक स्वरुपात भेट दिली. यावेळी दोन्ही शेतकरी कुटुंबातील सदस्यांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. शासनाच्या विविध विभागाकडून मिळणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ मिळतो की नाही, याबाबतही त्यांनी शहानिशा केली. तसेच त्या योजनांपासून सदर कुटुंब व तालुक्यातील इतर शेतकरी वंचित आहेत त्यांनाही त्या योजनांचा लाभ तत्काळ मिळण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या सूचना हेलोंडे यांनी अधिकाऱ्यांना केल्या. यावेळी प्रभारी तहसीलदार अनंत बकाले, प्रभारी गटविकास अधिकारी निमेश भोयर, तालुका कृषी अधिकारी सुहास भेंडे, पोलीस उपनिरीक्षक महेंद्र साळवे, पशु संवर्धनच्या सहाय्यक आयुक्त डॉ. सुजाता बन्सोड, महिला व बालविकास अधिकारी रवींद्र गजभिये, बालविकास प्रकल्प अधिकारी योगीता कुमरे, मनरेगाचे एपीओ दिनेश वाईकर, विस्तार अधिकारी प्रफुल्ल ठेंगेकर उपस्थित होते.



## चारा पिकांची लागवड करा

दरवर्षी पशूधनाला चाऱ्याचा प्रश्न भेडसावत असतो. कळंब तालुक्यात पशुंना मुबलक चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विविध विभागाच्या समन्वयातून कशी कारवाई करावी यावरही हेलोंडे यांनी मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी पूरक व्यवसायाकडे वळावे, असे आवाहन केले. शासकीय व इतर जमिनींसह नदीनाल्यांच्या काठावर चारापिकांची लागवड करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

## कळंब तहसीलमध्ये आढावा बैठक

कळंब तहसील कार्यालयात सर्व विभागप्रमुखांची आढावा बैठक ॲड. हेलोंडे पाटील यांनी घेतली. यामध्ये त्यांनी विविध कल्याणकारी योजनांचा लाभ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना द्यावा, असे आवाहन केले. कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, याबाबत दक्षता घेण्याची सूचना केली.

## शेतीपूरक व्यवसायांवर भर द्या!

मिशनचे अध्यक्ष ॲड. हेलोंडे यांनी प्रशासनाला काही महत्वाच्या टिप्स दिल्या. शेतकऱ्यांना शेतीसोबत शेतीपूरक व्यवसाय करता यावे, यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना केल्या. पशूपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन इत्यादी व्यवसायाचा लाभ शेतकऱ्यांना देण्याच्या दृष्टीने विभागाने नियोजन करावे, अशी सूचना केली.

पुण्य नगरी

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची घेतली भेट ■ प्रशासकीय यंत्रणेचा आढावा ■ शासकीय योजनांचा लाभ तातडीने देण्याचे निर्देश

# कळंब तालुक्यात राज्यमंत्री ॲड. नीलेश हेलोंडे यांचा दौरा

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**कळंब : महाराष्ट्र राज्य शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी ८ मे रोजी कळंब तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष भेट दिली आणि त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. तसेच, कोणताही पात्र शेतकरी शासकीय लाभापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासकीय यंत्रणेला तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.**

राज्यमंत्री ॲड. हेलोंडे यांनी तालुक्यातील कात्री आणि परसोडी (बु.) येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी दिनेश शालीक भुजाडे व महेश बळवंत ढोले यांच्या कुटुंबियांची प्रातिनिधिक स्वरूपात भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. शासनाच्या विविध विभागांकडून मिळणाऱ्या योजनांचा लाभ खरोखरच या कुटुंबांपर्यंत पोहोचतोय का, याची त्यांनी जागेवरच शहानिशा केली. जे कुटुंब लाभापासून वंचित आहेत, त्यांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागांना दिल्या. कुटुंबाच्या भेटीनंतर तहसील कार्यालयाच्या सभागृहात तालुक्यातील सर्व विभाग प्रमुखांची तातडीची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत बोलताना राज्यमंत्री म्हणाले की, शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ देताना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. तालुक्यातील एकही पात्र शेतकरी लाभाविना राहता कामा नये, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळीपालन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांकडे वळावे, यासाठी विभागाने विशेष मार्गदर्शन शिबिरे घ्यावीत. आगामी काळात पशूंना चारा टंचाई भासू नये, यासाठी नदी-नाल्यांच्या काठावर आणि उपलब्ध शासकीय जमिनींवर चारा पिकांची लागवड करण्याचे नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. या दौऱ्यात नायब तहसीलदार अनंत बकाले, सहाय्यक गटविकास अधिकारी निमेश भोयर, तालुका कृषी अधिकारी सुहास बेंडे, पोलीस उपनिरीक्षक महेंद्र साळवे, सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन) डॉ. सुजाता बनसोड, महिला व बालविकास अधिकारी रवींद्र गजभिये, बालविकास प्रकल्प अधिकारी योगीता कुमरे यांसह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



दिनांक ०८.०५.२०२६ रोजी कळंब तालुक्यातील कुरण लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी





दिनांक ०८.०५.२०२६ रोजी तहसिल कार्यालय, कळंब येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा





दिनांक १३.०५.२०२६ रोजी तराळा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम येथे कुरण क्षेत्र पाहणी तसेच शेतक-यांना चारा व थोंबे वाटप कार्यक्रमास उपस्थीत





दिनांक १४.०५.२०२६ रोजी कळमेश्वर, ता.मालेगांव, जि.वाशिम येथे मृतक रामकिसन बन्सी काळे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





दिनांक १४.०५.२०२६ रोजी विश्रामगृह, मालेगांव येथे गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा






**दिनांक १६.०५.२०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे कृषी विभागाद्वारे आयोजीत जिल्हास्तरीय खरीप हंगाम- २०२६ चे बैठकीस उपस्थीत**






दिनांक १७.०५.२०२६ रोजी नागपूर येथे आयोजीत नागपूर जलसंवाद कार्यक्रमास उपस्थीत




दिनांक १७.०५.२०२६ रोजी माजी मंत्री तथा आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे समवेत चारा लागवडीसंदर्भात चर्चा



